आस्थापना:- कोकण, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर व औरंगाबाद विभागातील करमणूक शुल्क शाखेतील विभागीय व जिल्हा पातळीवरील अस्थायी पदांना मुदतवाढ देणेबाबत.

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
शासन निर्णय क्रमांकः ईएनटी -०२१९/ प्र.क.३४/टी
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : १८ सप्टेंबर, २०१९.

वाचा :-

१. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, संकीर्ण १००२/ प्र.क्र.६६ (भाग-२)/ई-८, दि. २० मार्च, २००६.
२. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, पदनि-२०१४/ प्र.क्र.१३५/ई-८, दि. ३१ जुलै, २०१४.
३. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१५/प्र.क्र.५/१५/वित्तीय सुधारणा-१, दि.२० फेब्रुवारी, २०१५.
४. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, ईएनटी २०१५/ प्र.क्र.४८/टी-१, दि.१९ मार्च, २०१५.
५. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.११ फेब्रुवारी, २०१६.
६. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, ईएनटी २०१६/ प्र.क्र.६७/टी-१, दि. ०७ एप्रिल, २०१६.
७. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/वित्तीय सुधारणा-१, दि.२१ सप्टेंबर, २०१६
८. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, ईएनटी २०१६/ प्र.क्र.६७/टी-१, दि. १९ ऑक्टोबर, २०१६.
९. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क, दि.१० फेब्रुवारी, २०१७.
१०. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, ईएनटी २०१६/ प्र.क्र.६७/टी-१, दि. ३१ मार्च, २०१७.
११. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, ईएनटी २०१६/ प्र.क्र.६७/टी-१, दि. २४ जुलै,२०१७.
१२. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.०८/आ.पु.क, दि.०३ ऑक्टोबर,२०१७.
१३. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, ईएनटी २०१६/ प्र.क्र.६७/टी-१, दि. ०३ नोव्हेंबर, २०१७.
१४. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क, दि. ०८ जानेवारी,२०१८
१५. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, ईएनटी २०१६/ प्र.क्र.६७/टी-१, दि. ७ फ़ेब्रुवारी, २०१८.
१६. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क, दि. ०५ मार्च, २०१८
१७. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, ईएनटी २०१६/ प्र.क्र.६७/टी-१, दि.१३ एप्रिल, २०१८.
१८. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क, दि.७ सप्टेंबर, २०१८.
१९. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, ईएनटी-२०१६/प्र.क्र.६७/टी-१, दि.१७ ऑक्टोबर, २०१८.
२०. शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क., दि.२१ फेब्रुवारी, २०१९,
२१. शासन निर्णय, महसूल व वन विभाग, ईएनटी-०२१९/प्र.क्र.३४/टी, दि.२१ फेब्रुवारी, २०१९.
२२. शासन निर्णय, वित्त विभाग क्र. पदनि-२०१६/प्र.क्र.०८/१६/आ.पु.क, दि.११ सप्टेंबर, २०१९.

प्रस्तावना :-

दि. १ जुलै, २०१७ पासून राज्यात लागू झालेल्या वस्तू व सेवा कर अधिनियमाचा विचार करता, राज्यातील कोकण, पुणे, नाशिक, अमरावती, नागपूर व औरंगाबाद विभागातील सर्व जिल्हयात करमणूक शुल्क, पैज कर व जाहिरात कर यांची वसूली करणे, कर चुकवेगिरीस आळा घालणे व कर चुकेवगिरीची प्रकरणे शोधून दंडात्मक कारवाई करणे या प्रयोजनांसाठी निर्माण करण्यात आलेल्या एकूण १० संवर्गातील विभागीय पातळीवरील ३६ आणि जिल्हा पातळीवरील ३७९ अशा एकूण ४१५ इतक्या अस्थायी पदांना, प्रथमत: दि.२४ जुलै, २०१७ च्या शासन निर्णयान्वये दि.०१ जुलै, २०१७ ते दि. ३० सप्टेंबर २०१७ या कालावधीकरिता, तसेच दि.०३ ऑक्टोबर, २०१७ च्या शासन निर्णयान्वये दि.०१ ऑक्टोबर, २०१७ ते

दि.३१ डिसेंबर, २०१७ या कालावधीकरिता व तदनंतर दि.७ फेब्रुवारी, २०१८ च्या शासन निर्णयान्वये दि.१ जानेवारी, २०१८ ते दि.२८ फेब्रुवारी, २०१८, दि.१३ एप्रिल, २०१८ च्या शासन निर्णयान्वये दि.१ मार्च, २०१८ ते दि.३० सप्टेंबर, २०१८, दि.१७.१०.२०१८ च्या शासन निर्णयान्वये दि.१ ऑक्टोबर, २०१८ ते दि.२८ फेब्रुवारी, २०१९ आणि दि.०६ मार्च, २०१९ च्या शासन निर्णयान्वये दि.०१ मार्च, २०१९ ते दि.३० सप्टेंबर, २०१९ या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात आलेली आहे.

संदर्भाधीन क्र. २२ वरील वित्त विभागाच्या दि.११.९.२०१९ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय विभाग व त्यांच्या अधिपत्त्याखालील कार्यालयातील अस्थायी पदांना दि.०१.१०.२०१९ ते दि.२९.०२.२०२० पर्यंत मुदतवाढ देण्याचे अधिकार संबंधित मंत्रालयीन प्रशासकीय विभागास देण्यात आले आहेत.

त्यानुषंगाने महाराष्ट्र करमणूक शुल्क अधिनियमातील कलम ३ मधील तरतुदींनुसार करमणुकीच्या विविध साधनांवर दि.३० जून, २०१७ पर्यंत आकारण्यात आलेल्या करमणूक शुल्काच्या रकमांची वसुली व मोठ्या प्रमाणावर प्रलंबित असलेल्या लेखा परिच्छेदांचा निपटारा होईपर्यंत राज्यातील सर्व करमणूक शाखेतील सर्व संवर्गातील विभागीय पातळीवरील तसेच जिल्हा पातळीवरील करमणूक शुल्क शाखेच्या अखत्यारीत येणाऱ्या एकूण ४१५ पदांना दि.०१.१०.२०१९ ते दि.२९.०२.२०२० या कालावधीकरीता मुदतवाढ देण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन निर्णय</u> :-

राज्यातील सर्व विभागीय आयुक्त कार्यालयातील तसेच सर्व जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांच्या करमणूक शुल्क शाखेतील एकूण ९ संवर्गातील विभागीय पातळीवरील ३६ आणि जिल्हा पातळीवरील ३७९ अशा एकूण ४१५ अस्थायी पदांना दि.०१.१०.२०१९ ते दि.२९.०२.२०२० या कालावधीकरीता खालील अटींच्या अधीन राहून मुदतवाढ देण्यात येत आहे:-

(१) विभागीय व जिल्हा पातळीवरील एकूण ४१५ इतकी पदे महसूल विभागाद्वारे यापूर्वी दि. २० मार्च, २००६ च्या शासन निर्णयाद्वारे निश्चित आकृतीबंधामध्ये समाविष्ट नसल्यास, अशा पदांचा आढावा घेऊन त्याबाबतचा प्रस्ताव मुदतवाढीच्या कालावधीमध्ये उच्चस्तरीय सचिव समितीची मान्यता प्राप्त करुन घेण्याकरीता संबंधित विभागीय आयुक्त कार्यालयाने या विभागास (कार्यासन ई-८ कडे) सादर करावा.

(२) सर्व विभागीय आयुक्तांच्या अधिपत्याखालील उपायुक्त (करमणूक शुल्क) यांनी त्यांच्या विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये शासनाकडून विहित करण्यात आलेल्या प्रमाणात, विहीत नियमांनुसार, करमणूक केंद्रांच्या व्यक्तीशः नियमित तपासण्या कराव्यात. तसेच, जिल्हाधिकारी कार्यालयातील करमणूक शुल्क वसुलीबाबतच्या अभिलेखांच्या नियमित तपासण्या विहीत नियमांनुसार करुन प्रत्येक कॅलेंडर महिन्याच्या तपासण्यांचे अहवाल त्यापुढील कॅलेंडर महिन्याच्या १५ तारखेपूर्वी कोणत्याही परिस्थीतीत शासनास सादर करावेत.

(३) सर्व विभागीय आयुक्त/जिल्हाधिकारी यांनी संबंधित विभागातील/जिल्ह्यातील करमणूक शुल्क यंत्रणेकरीता मंजूर केलेल्या अस्थायी पदांवरील अधिकाऱ्यांच्या /कर्मचाऱ्यांच्या सेवा शासनाच्या पूर्व मंजूरीशिवाय इतर कामांकरिता वापरल्या जाणार नाहीत, याची दक्षता घ्यावी. तसेच, शासनाच्या पूर्व परवानगीखेरीज सदरची पदे इतर शाखांमध्ये वापरल्याचे शासनाच्या निदर्शनास आल्यास अशी पदे व्यपगत करण्यात येतील.

(४) उपरोक्त सर्व अस्थायी पदांवरील पदधारक प्रचलित शासकीय नियमांनुसार प्रवास भत्ता, स्थानिक पूरक भत्ता यासह इतर सर्व अनुज्ञेय भत्ते मिळण्यास पात्र आहेत.

(५) सोबतच्या “विवरणपत्र -अ” व “विवरणपत्र -ब” मध्ये दर्शविलेली एकूण ९ संवर्गातील एकूण ४१५ इतकी अस्थायी पदे ही त्या-त्या संवर्गातील तात्पुरती भर समजण्यात येतील.

(६) करमणूक शुल्क व जाहिरात कर या पदांसाठीचा खर्च "मागणी क्रमांक सी-३, २०४५-विक्रेय वस्तू व सेवा यावरील इतर कर व शुल्क-१०१ वसूलीचा खर्च-करमणूक शुल्क-१०१ (तीन) आयुक्त कोकण-वेतने (२०४५ ००९ १०१)-१०१ (चार) आयुक्त नाशिक-वेतने १०१ (२०४५ ०१० ८०१)-१०१ (पाच) आयुक्त पुणे-वेतने (२०४५ ०११ ७०१)-१०१ (सहा) आयुक्त अमरावती -वेतने (२०४५ ०१२ ६०१)-१०१ (सात) आयुक्त, नागपूर-वेतने (२०४५ ०१३ ५०१)-१०१ (आठ) आयुक्त, औरंगाबाद-वेतने (२०४५ ०१४ ४०१)" या लेखाशीर्षाखाली सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षाकरिता मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा. तसेच, पणकर वसूलीसाठी मंजूर करण्यात आलेल्या पदांसाठीचा खर्च, "मागणी क्रमांक सी-३-२०४५-विक्रेय वस्तू व सेवा यावरील इतर कर व शुल्क-१०२ वसूलीचा खर्च-जूगार कर-(००) (०१) जिल्हाधिकारी-मुंबई वेतने (२०४५ ०१६ २०१)-(००) (०२) आयुक्त पुणे-वेतने (२०४५ ०१७ १०१)" या लेखाशिर्षाखाली सन २०१९-२०२० या वित्तीय वर्षाकरीता मंजूर होणाऱ्या अनुदानातून भागविण्यात यावा.

(७) सदर शासन निर्णय, वित्त विभाग क्र.पदनि-२०१६/प्र.क्र.८/१६/आ.पु.क, दि.११.९.२०१९ अन्वये प्रशासकीय विभागांना प्रदान करण्यात आलेल्या वित्तीय अधिकारांचा वापर करुन निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०९१८१९३९३८८९१९ असा आहे. हा शासन निर्णय डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Madhav Veer

Digitally signed by Madhav Veer
DN: CN = Madhav Veer, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = Revenue And Forests Department
Date: 2019.09.18 19:47:18 +05'30'

(डॉ. माधव वीर)
शासनाचे उप सचिव

सोबत : विवरणपत्र - "अ", "ब" व “क”

प्रत,

(१) मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुबई-३२.
(२) मा. मंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुबई-३२.
(३) मा. राज्यमंत्री (महसूल) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुबई-३२.
(४) अपर मुख्य सचिव (महसूल, मुद्रांक शुल्क व नोंदणी) यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई-३२.
(५) विभागीय आयुक्त, कोकण/पुणे/नाशिक/अमरावती/नागपूर/औरंगाबाद
(६) सर्व जिल्हाधिकारी .
(७) सर्व उपायुक्त (करमणूक शुल्क) विभागीय आयुक्त कार्यालय, कोकण/पुणे/नाशिक/अमरावती/ नागपूर/औरंगाबाद.
(८) प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा १/२), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.

(९) प्रधान महालेखापाल (लेखा अनुज्ञेयता १/२), महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
(१०) वित्त विभाग (कार्यासन व्यय-९/वित्तीय सुधारणा), मंत्रालय, मुंबई-३२.
(११) कार्यासन-ब-१, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
(१२) कार्यासन-ई-८, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
(१३) निवडनस्ती, कार्यासन-टी,महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

विवरणपत्र क्र. (अ)

शासन निर्णय क्र.ईएनटी-०२१९/प्र.क्र.३४/टी, दि. १८. ९.२०१९ सोबतचे सहपत्र

कोकण, नाशिक, पुणे, औरंगाबाद, अमरावती, नागपूर विभागातील विभाग पातळीवरील करमणूक शाखेतील अस्थायी पदांना दि.१.१०.२०१९ ते दि.२९.२.२०२० या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात आलेली पदे.

विभागस्तरावरील करमणूक शाखेतील अस्थायी पदांचे विभागनिहाय विवरण							
अ.क्र.	विभाग	उपायुक्त(करमणूक शुल्क) (अपर जिल्हाधिकारी श्रेणी)	करमणूक शुल्क निरीक्षक(अव्वल कारकून श्रेणी)	लिपिक-टंकलेखक	शिपाई	वाहनचालक	एकूण
१	कोकण	१	२	१	१	१	६
२	नाशिक	१	२	१	१	१	६
३	पुणे	१	२	१	१	१	६
४	औरंगाबाद	१	२	१	१	१	६
५	अमरावती	१	२	१	१	१	६
६	नागपूर	१	२	१	१	१	६
एकूण		**६**	**१२**	**६**	**६**	**६**	**३६**

विवरणपत्र क्र. (ब)

शासन निर्णय क्र.ईएनटी-०२१९/प्र.क्र.३४/टी, दि. १८.९.२०१९ सोबतचे सहपत्र

कोकण,नाशिक,पुणे,औरंगाबाद,अमरावती,नागपूर विभागातील जिल्हा पातळीवरील करमणूक शाखेतील अस्थायी पदांना दि.०१ .१०.२०१९ ते दि.२९.२.२०२० या कालावधीकरिता मुदतवाढ देण्यात आलेली पदे.

जिल्हास्तरावरील करमणूक शाखेतील अस्थायी पदांचे जिल्हानिहाय विवरण													
अ.क्र.	विभाग	जिल्हा	करमणूक शुल्क अधिकारी (तहसिलदार श्रेणी)	सहायक करमणूक शुल्क अधिकारी (नायब तहसिलदार श्रेणी)	करमणूक शुल्क निरीक्षक(अव्वल कारकून श्रेणी)	वरिष्ठ लेखापरिक्षक	निम्नश्रेणी लघुलेखक	कनिष्ठ लिपिक	लिपिक-टंकलेखक	शिपाई	वाहनचालक	एकूण
१	कोकण	मुंबई शहर	१	५	१४	१	१	०	५	२	१	३०
		मुंबई उपनगर	१	२	१२	०	०	०	६	१	१	२३
		ठाणे	१	२	१३	०	०	०	४	२	१	२३
		पालघर	०	१	४	०	०	०	०	१	०	६
		रायगड	०	१	४	०	०	०	१	१	०	७
		रत्नागिरी	०	१	२	०	०	१	०	१	०	५
		सिंधुदुर्ग	०	१	१	०	०	०	१	१	०	४
		एकूण	**३**	**१३**	**५०**	**१**	**१**	**१**	**१७**	**९**	**३**	**९८**
२	नाशिक	नाशिक	१	१	१३	०	०	०	३	२	१	२१
		धुळे	०	१	५	०	०	०	०	०	०	६
		नंदुरबार	०	०	२	०	०	०	०	०	०	२
		जळगांव	१	१	९	०	०	०	२	२	१	१६

		अहमदनगर	०	१	१०	०	०	०	२	१	०	१४
		एकूण	**२**	**४**	**३९**	**०**	**०**	**०**	**७**	**५**	**२**	**५९**
३	पुणे	पुणे	१	३	२०	०	०	०	३	३	१	३१
		सातारा	०	१	५	०	०	०	१	१	०	८
		सांगली	०	१	७	०	०	०	१	१	०	१०
		सोलापूर	१	१	१९	०	०	०	३	२	१	२७
		कोल्हापूर	१	१	१०	०	०	०	२	२	१	१७
		एकूण	**३**	**७**	**६१**	**०**	**०**	**०**	**१०**	**९**	**३**	**९३**
४	औरंगाबाद	औरंगाबाद	०	१	१०	०	०	०	२	२	०	१५
		जालना	०	०	२	०	०	०	१	१	०	४
		परभणी	०	१	४	०	०	०	१	१	०	७
		हिंगोली	०	०	२	०	०	०	१	१	०	४
		नांदेड	०	१	८	०	०	०	१	२	०	१२
		बीड	०	०	४	०	०	०	१	१	०	६
		लातूर	०	१	५	०	०	०	१	१	०	८
		उस्मानाबाद	०	०	३	०	०	०	१	१	०	५
		एकूण	**०**	**४**	**३८**	**०**	**०**	**०**	**९**	**१०**	**०**	**६१**
५	अमरावती	अमरावती	०	१	५	०	०	०	१	१	०	८
		अकोला	०	१	४	०	०	०	१	१	०	७
		यवतमाळ	०	१	५	०	०	०	१	१	०	८
		बुलढाणा	०	१	५	०	०	०	१	१	०	८
		वाशिम	०	०	२	०	०	०	०	०	०	२
		एकूण	**०**	**४**	**२१**	**०**	**०**	**०**	**४**	**४**	**०**	**३३**

६	नागपूर	नागपूर	०	१	९	०	०	०	२	२	०	**१४**
		वर्धा	०	१	२	०	०	०	१	१	०	**५**
		भंडारा	०	१	२	०	०	०	१	१	०	**५**
		गोंदिया	०	१	०	०	०	०	०	०	०	**१**
		चंद्रपूर	०	१	४	०	०	०	१	१	०	**७**
		गडचिरोली	०	०	२	०	०	०	१	०	०	**३**
		एकूण	**०**	**५**	**१९**	**०**	**०**	**०**	**६**	**५**	**०**	**३५**
एकूण			८	३७	२२८	१	१	१	५३	४२	८	३७९

शासन निर्णय क्र.ईएनटी-०२१९/प्र.क्र.३४/टी, दि. १८.९.२०१९ सोबतचे सहपत्र

विवरणपत्र "क"

अस्थायी पदांची संख्या व वेतनश्रेणी दर्शविणारे विवरणपत्र.

अ.क्र.	पदनाम	वेतनश्रेणी (रू.)	विभागीय स्तरावरील एकूण पद संख्या	जिल्हा स्तरावरील एकूण पद संख्या	एकूण (४+५)
१	२	३	४	५	६
१	उप आयुक्त (करमणूक शुल्क) (अपर जिल्हाधिकारी श्रेणी)	१५,६००-३९,१००+ ग्रेड पे ७६००	६	०	६
२	करमणूक शुल्क अधिकारी (तहसिलदार श्रेणी)	१५,६००-३९,१००+ ग्रेड पे ५०००	०	८	८
३	सहायक करमणूक शुल्क अधिकारी (नायब तहसिलदार श्रेणी)	९,३००-३४,८००+ ग्रेड पे ४३००	०	३७	३७
४	करमणूक शुल्क निरीक्षक (अव्वल कारकून श्रेणी)	५,२००-२०,२००+ ग्रेड पे ३५००	१२	२२८	२४०
५	वरिष्ठ लेखा परीक्षक	५,२००-२०,२००+ ग्रेड पे २८००	०	१	१
६	निम्नश्रेणी लघुलेखक	९,३००-३४,८००+ ग्रेड पे ४३००	०	१	१
७	लिपीक-टंकलेखक	५,२००-२०,२००+ ग्रेड पे १९००	६	५४	६०
८	वाहनचालक	५,२००-२०,२००+ ग्रेड पे २४००	६	८	१४
९	शिपाई	४,४४०-७,४४०+ ग्रेड पे १३००	६	४२	४८
	एकूण पद संख्या		३६	३७९	४१५